# 'कुंकू लावले, तरच बोलेन'

## संभाजी भिडे यांचे पत्रकाराला उद्देशून वादग्रस्त वक्तव्यः महिला आयोगाची नोटीस

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**मुंबई :** वादग्रस्त वक्तव्यांमुळे नेहमी चर्चेत असलेले शिवप्रतिष्ठान संघटनेचे अध्यक्ष संभाजी भिडे यांनी बुधवारी पुन्हा वादग्रस्त वक्तव्य केले असून 'कुंकू लावले, तरच बोलेन' असे त्यांनी एका महिला पत्रकाराला बजावले आणि बोलण्यास नकार दिला.

संभाजी भिडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बुधवारी मंत्रालयात भेट घेतली. त्यानंतर एका खासगी वृत्तवाहिनीच्या महिला पत्रकाराने त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. तेव्हा 'तू आधी कुंकू किंवा टिकली लाव, तरच तुझ्याशी बोलेन. प्रत्येक स्त्री ही भारत मातेचे रूप आहे. भारत माता विधवा नाही. आधी टिकली लाव, मग तुझ्याशी बोलतो,' असे वक्तव्य करीत भिडे यांनी बोलण्यास नकार दिला.

या प्रकाराची राज्य महिला आयोगाने गंभीर दखल घेतली असून भिडे यांना नोटीस पाठवून स्पष्टीकरण मागविले जाणार आहे. अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी भिडे यांच्या वक्तव्याचा निषेध केला आहे. 'आंबे खाल्ल्याने मुले होतात', असे वक्तव्य संभाजी भिडे यांनी यापूर्वी केले होते. एक महिला पत्रकार शिक्षण घेऊन या व्यवसायात आली आहे. टिकलीवरून महिलेची पात्रता आणि पद ठरवणे चुकीचे आहे. ही समाजाची विकृती आहे. सातत्याने महिलांना दुय्यम लेखणाऱ्यांची विकृती नाहीशी करायची आहे, असे चाकणकर यांनी स्पष्ट केले.

# 'आधी कुंकू लाव; मगच तुझ्याशी बोलेन'

## संभाजी भिडे यांची महिला पत्रकाराला 'सूचना'



**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधणारे संभाजी भिडे यांनी एका महिला पत्रकाराला, आधी तू कुंकू लाव; मगच तुझ्याशी बोलेन अशी 'सूचना' केल्याने वाद उफाळला आहे.

संभाजी भिडे यांनी बुधवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली. मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन बाहेर पडल्यानंतर एका मराठी वृत्तवाहिनीच्या महिला पत्रकाराने संभाजी भिडे यांना प्रश्न विचारला. तुम्ही आज मंत्रालयात कोणाची भेट घेतली?, असे या महिला पत्रकाराने विचारले. त्यावर 'तू आधी कुंकू किंवा टिकली लाव, तरच तुझ्याशी बोलेन', असे भिडे म्हणाले. 'प्रत्येक स्त्री ही भारतमातेचे रूप आहे. आमची भारतमाता विधवा नाही', असेही ते पुढे म्हणाले. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाल्यापासून मी त्यांची भेट घेतली नव्हती. त्यामुळेच आज त्यांची सदिच्छा भेट घेतली, असे भिडे यांनी यावेळी पत्रकारांना सांगितले. मंत्रीमंडळाचे जे काही काम सुरू आहे ते कौतुकास्पद आहे, असेही ते म्हणाले.

दरम्यान, संभाजी भिडे यांच्या या वक्तव्याचा विविध स्तरांतून तीव्र निषेध करण्यात येत आहे. राज्य महिला आयोगाने त्या संदर्भात खुलासा करण्यास भिडे यांना सांगितले आहे. स्त्रीचा दर्जा तिच्या कर्तृत्वाने सिद्ध होत असतो, असे म्हणत, आपले वक्तव्य स्त्रीचा सन्मान व सामाजिक दर्जा यांना धक्का पोहोचवणारे आहे, असे महिला आयोगाने भिडे यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे.

# 'आधी कुंकू लाव, मगच बोलेन'

## संभाजी भिडे यांच्याकडून पुन्हा महिलांचा अपमान

मुंबई, ता. २ : शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी वादग्रस्त विधान करून पुन्हा महिलांचा अपमान केला आहे. टिकली लावली नाही म्हणून 'साम' टीव्हीच्या महिला पत्रकाराला प्रतिक्रिया देण्यास त्यांनी नकार दिला. 'आधी कुंकू लाव मगच तुझ्याशी बोलतो,' असे सांगताना भारत माता विधवा नाही, असेही ते म्हणाले. भिडे यांना या प्रकारानंतर महिला आयोगाने नोटीस बजावली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटायला भिडे गुरुजी मंत्रालयात गेले होते. त्यांची प्रतिक्रिया घेण्यासाठी 'साम'च्या बातमीदार रूपाली बडवे गेल्या असता कपाळाला कुंकू नसल्याचे सांगत भिडे यांनी प्रतिक्रिया द्यायला नकार दिला.

स्त्रियांच्या वैयक्तिक आयुष्यात भिडे गुरुजी ढवळाढवळ करीत आहेत. मंत्रालयात असे प्रकार घडणे गंभीर असल्याचे विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या.

साम टीव्हीच्या महिला पत्रकाराला तू टिकली लावली नाही म्हणून तुझ्याशी बोलणार नाही असे सांगत त्या महिलेचा आणि पत्रकारितेचाही अपमान करणाऱ्या संभाजी भिडे यांचा निषेध आहे. त्यांना आत्मचिंतनाची गरज आहेच. टिकली ही महिलेच्या कर्तृत्वाचे मोजमाप नाही. त्यांनी आज केलेल्या वक्तव्याचा खुलासा करावा.

**- रुपाली चाकणकर,**
अध्यक्षा, महिला आयोग